## प्रकरण पहिले

# मागासवर्गीय समाजाची
# १९२० पुर्वीची शैक्षणिक स्थिती

शिक्षण ही अन्न, वस्त्र, निवारा या तीन मूलभूत गरजांइतकीच महत्त्वाची गरज आहे शिक्षणाने माणसाला स्वतंत्र विचारांची दिशा व व्यक्तिमत्व मिळते. व्यक्तिमत्वाचा विकास योग्य दिशेने होण्यासाठी शिक्षण हे अत्यंत महत्त्वाचे साधन आहे. समाजाच्या विकासासाठी तसेच व्यक्तीच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, बौध्दीक आणि मानसिक उत्कर्षासाठी शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही. थोडक्यात शिक्षण हे समाज विकासाचे मूलभूत साधन आहे. पण प्रागैतिहासिक कालखंडापासून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याच्या सुरुवातीपर्यंतच्या काळात मागासवर्गीय, दलित किंवा अस्पृश्य समाजाला शिक्षणाची दारे बंद केली गेली होती. भारतीय समाज चातुर्वण्य समाज व्यवस्थेत विभागला होता. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र या विषमतावादी समाज व्यवस्थेत अध्ययन अध्यापनाचे कार्य ब्राह्मण या वर्गाने, लढाया व संरक्षण क्षत्रियाने, व्यापार वैश्याने तर या तिन्ही वर्गाची सेवा शुद्रांनी करायची. यामुळे शूद्र किंवा अंत्यज या वर्गाच्या शिक्षणाचा प्रश्न निर्माण होणे अशक्यच होते. प्रस्थापित धर्मग्रंथानी त्यांचा शिक्षणाचा व समानतेचा हक्क नाकारला होता. त्यांना धार्मिक हक्क अधिकारापासून वंचित ठेवले होते. मनुप्रणित धर्मग्रंथांच्या प्रथा-परंपरा रुढी चालीरिती या समाजव्यवस्थेत भारतीय समाज गुरफटला होता. या विषमतावादी समाज व्यवस्थेवरती प्रथम हल्ला गौतम बुध्दाने केला.

## १) बौध्दकालीन शिक्षण

बौध्द धर्माच्या चळवळीने शिक्षण व्यवस्थेमध्ये मौलिक परिवर्तनास प्रारंभ केला. पारंपारिक ज्ञानाच्या संकल्पनेत बौध्दवादाने परिवर्तन घडवून आणले हे त्याचे पहिले योगदान आहे, तर ज्ञान संक्रमण व संपादनाच्या जातीबध्द रचनेवर आघात हे त्याचे दुसरे योगदान आहे. ज्ञानप्रसार, ज्ञानाचे अध्ययन-अध्यापन आणि ज्ञान व समाजजीवन यांची आंतरक्रिया या क्षेत्रात एक क्रांतीच बुध्दामुळे भारतीय समाजात झाली. बौध्द कालखंडामध्ये तक्षशिला, नालंदा विद्यापीठांची स्थापना केली गेली. या

विद्यापीठांमधून धार्मिक व इतर विषयांचा अभ्यास केला जात असे. बुध्दाने वर्णव्यवस्थेवरतीच हल्ला चढविल्याने सर्वांना शिक्षण घेण्याची समान संधी प्राप्त झाली. त्यामुळे बौध्द भिक्षू व भिक्षूनींच्या संघातून सर्व जातीधर्माचे लोक एकत्र आले. भिक्षूसंघातून व बौध्दकालीन विद्यापीठांतून वर्णवर्चस्ववाद व वैदिक मतांचे खंडण करण्याचे कौशल्य येण्यासाठी वादविवाद व चर्चा ही अभ्यासाची पध्दती अनुसरली जात होती.[१] ही अभ्यासपध्दती वैदिक पध्दतीपेक्षा पूर्णतः भिन्न होती.

युवांग श्वांगने नालंदा विद्यापीठात १०,००० विद्यार्थी, १५०० अध्यापक व २ त ९ मजली ग्रंथालयाचे वर्णन केले आहे. या विद्यापीठात रोज १०० व्याख्याने देण्याची सोय केलेली होती. शिक्षण मात्र विनामूल्य होते.[२] ज्ञानाची दारे सर्वांसाठी खुली झाल्यामुळे वैदिक समाजव्यवस्थेतील पुरोहितशाहीविरोधी मोठा सांस्कृतिक संघर्ष बौध्द काळात भारतात उभा राहिल्याचे दिसते.

गौतम बुध्दाने पुरुषांबरोबर स्त्रियांनाही भिक्षूसंघात प्रवेश दिला. त्यामुळे पुरूषांबरोबर स्त्रिया ही शिक्षण घेऊ लागल्या. संघात प्रवेश घेतलेल्या अनेक स्त्रिया स्वयंप्रज्ञ आणि धर्मोपदेशक व तत्वज्ञ बनल्या. सम्राट अशोकाच्या काळात स्त्रिया उच्च शिक्षण घेत असल्याची माहिती मिळते. ''बुध्दाने सुनिता (शुद्र), साती (कोळी), नंद (गवळा), कपा, पुन्ना, पुन्नीका (दास), सुमंगलमाता (शिंपी), शुभा (लोहार) या अशा अनेक शुद्रातीशुद्र स्त्रियांना संघात मानाची स्थाने दिली.[३] या ज्ञानप्रसाराचा परिणाम इतका खोल झाला की भारताच्या शोषित उपेक्षित व वंचित असणाऱ्या स्त्रियांनाही आत्ममुक्तीची प्रेरणा निर्माण झाली. पण पुढच्या काळामध्ये बौध्द धर्माचा ऱ्हास सुरु झाला आणि जातीसंस्था दृढमूल झाली. या नव्या समाजव्यवस्थेत ब्राम्हणवर्गाने सामाजिक व सांस्कृतिक वर्चस्व निर्माण केले. बौध्द कालखंडात सुरु झालेली ज्ञान प्रक्रिया खंडित केली गेली. त्यामुळे इ.स.च्या ७ व्या शतकापासून ते १९ व्या शतकापर्यंतचा कालखंड हा मागासवर्गीयांच्या शिक्षणाच्या दृष्टीने अंधारयुगाचा मानता येईल.

## २) मध्ययुगीन कालीन शिक्षण

१३ व्या शतकामध्ये मुस्लिमांची सत्ता भारतात स्थापन झाली. मदरसा मधून मुस्लिमांना तर मंदिरातून हिंदूंना शिक्षण दिले गेले. मुस्लिम राज्यामध्ये प्रजेसाठी शिक्षणाची सोय करणे. ही सरकारची जबाबदारी मानली जात नसे. उदार, शिक्षणप्रेमी राज्यकर्ते शिक्षण संस्थांना आणि विद्वानांना आर्थिक मदत व विविध सवलतीसुद्धा देत असत. मात्र अशी सलवत देणे सरकारवरती बंधनकारक मानले जात नसे. बख्तियार खिलजीने १३ व्या शतकाच्या सुरुवातीला बौद्ध विद्यापीठे किल्ले समजून उध्वस्त केली. आणि या काळात बौद्ध धर्माचीही पिछेहाट झाली. मात्र हिंदू शिक्षणपद्धती मधील गुरुकुल शिक्षणपद्धती चालू होती. मध्ययुगीन कालखंडामध्येही ज्ञानसत्ता व ज्ञानभाषा यावरती ब्राम्हणांचे वर्चस्व असल्याचे दिसते. मात्र मध्ययुगाच्या उत्तर कालखंडात भक्ती चळवळीने या व्यवस्थेला आव्हान दिले मध्ययुगीन संतानी सामाजिक समतेसाठी प्रयत्न केला. सामाजिक समतेसाठी प्रयत्न करणाऱ्या या विद्रोही संताचा विद्रोह बळकट झालेल्या जातीव्यवस्थेने गिळंकृत केला. यामुळे मागास समाजाच्या शिक्षणाच्या प्रगतीचा आलेख उत्तरोत्तर खाली येऊ लागला.

मध्ययुगाच्या शेवटच्या पर्वात महाराष्ट्रात पेशव्यांच्या सत्तास्थानामुळे ब्राम्हणांची सत्ता पुनर्रप्रस्थापित झाली आणि स्त्री शुद्रातीशुद्रावरील बंधने अधिक आवळली गेली. पेशव्यांच्या काळामध्ये महार, मांग आणि चांभार गावच्या बाहेर रहात होते. गावच्या भोवती भिंत होती. त्याला 'गावकुस' असे म्हणत असत. १७८७-८८ मध्ये 'वरी' या कुंभारी परगण्यातील गावची भिंत गोदावरी नदीच्या पुरामुळे तिन्ही बाजूंनी पडली, तेव्हा सरकारी महसूलातून गावकऱ्यांना भिंतीच्या दुरुस्तीसाठी १००० रुपये दिले.[४] पेशवे काळांमध्ये कमालीची जातीयता होती. मनूनिर्मित चार वर्ण ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, शुद्र असे मानले गेले होते. या नियमांचे काटेकोरपणे पालन पेशवे काळात केले गेले. अंत्य, अंत्यज किंवा अंत्यवासीन हे गावाबाहेर रहात असून त्यांना कोणत्याही वर्णात स्थान

नव्हते. म्हाराने आपले पायरीने असावे अत:पर असे जाहलियास मुलाजा होणार नाही म्हणून ताकीद करणे[५] असा गंभीर इशारा देणारे कायदे ही केले गेले होते. पेशवेकाळातील साहित्यामध्ये महार, मांग, चांभार यांना अस्पृश्य मानले जात होते. महारांना धेड, भूमीया, येसकर किंवा तराळ, तर मांग या जातीला वाजंत्री, मांगगारुडी आणि चांभाराला मोची जीनगर असेही संबोधले जात होते. यामध्ये महार ही एक अस्पृश्य जात होती. त्यामुळे पेशवे काळात प्रचंड मोठ्या प्रमाणात जातीयतेचे चटके सर्वच मागावर्गीय व पददलित या जातींना सहन करावे लागले.

## ३) पेशवेकालीन शिक्षण

पेशवाईच्या काळात अस्पृश्यांची आणि स्त्रियांची परिस्थिती जनावरांपेक्षा वाईट बनली. वेठबिगारी सक्तीची झाली. हे न अवलंबनाऱ्या अस्पृश्यांसाठी शिक्षा कठोर झाल्या. स्त्री शुद्रातीशूद्रांचा स्वातंत्र्याचा मुलभूत हक्कच हिरावून घेण्यात आला.

जेव्हा पाश्चिमात्य देशांमध्ये स्वातंत्र्य - समता - बंधुता या मानवी मूल्यासाठी संघर्ष चालू होता, विज्ञानाच्या सहाय्याने मानवी जीवन अधिक सुखी करण्यासाठी शास्त्रज्ञ, विचारवंत राबत होते. ग्रंथालये, प्रयोगशाळा उभारल्या जात होत्या, त्यावेळी पेशव्यांच्या राजधानीत मात्र 'रमणा' (ब्राम्हणांना सहस्त्रभोजन) व अस्पृश्यतेचे काटेकोरपालन हा प्रकार चालला होता. पुण्यामध्ये पर्वतीच्या पायथ्याला श्रावण महिन्यात देशभरातील ब्राम्हण भिक्षुकांना भोजन आणि दक्षिणा वाटल्या जात होत्या.धर्माच्या नावावरती लूट चालली होती. लक्षावधी रुपये ब्राम्हणांना दान म्हणून दिले जात होते.[६]

पेशव्यांनी देवाधर्माच्या नावावरती जेवढे रुपये उधळले तेवढे जर का विज्ञान विकासासाठी आणि संशोधनासाठी खर्च केले असते तर आजच्या भारताचे चित्र खूपच निराळे दिसले असते. दुसऱ्या बाजीराव पेशव्यांनी १८१६ साली रमणासाठी, ७८१३५ ब्राम्हणांना ४,४१,१२८ रुपये दक्षिणा वाटली. थोडक्यात पेशव्यांचा दृष्टीकोन शिक्षणापेक्षाही ब्राम्हणशाहीच्या धर्मकारणावरती जास्त असल्याचे दिसते.

या जातीयतेला शह देऊन ब्राह्मणी वर्चस्व झुगारून लावणाऱ्या महात्मा फुलेंचा उदयही पेशव्यांच्या राजधानीत १९व्या शतकातच झाला. अज्ञान व शिक्षणापासून फारकत ही मागासलेपणाची कारणे जाणून त्यांनी ब्राह्मणेत्तरांचे शिक्षण व समानता ही आपल्या चळवळीची उद्दिष्ट्ये मांडली. १५ सप्टेंबर १८५३ च्या 'ज्ञानोदय' मध्ये महात्मा फुले म्हणतात,

" मी एका मित्रासोबत अहमदनगरास जाऊन तेथे अमेरिकन मिशन खात्यातील फरार मॅडमच्या कन्या शाळा पाहिल्या आणि मला मोठा आनंद झाला कारण की, त्या चांगल्या रितीने चालल्या होत्या. मग मी पुण्यात येऊन लागलीच एक मुलींची शाळा घातली. लहूजी मांग व राणबा म्हार यांनी शिकण्यापासून कसे लाभ आहेत हे आपल्या जातवाल्यांना समजावून सांगितले व सदाशिव बल्लाळ गोवंडे यांनी शाळेसाठी जागा देऊन काही पाट्या दिल्या व दर महिन्यास २रुपये देऊ लागले. या शाळेला दरमहा २५ रुपये पुण्यातील दक्षिणे पैकी मिळतात." [७]

यावरुन एक गोष्ट लक्षात येते की, १८१६ साली दुसरा बाजीराव पेशवा रमणासाठी ७८,१३५ ब्राम्हणांना ४,४१,१२८ रुपये दक्षिणा वाटतो तर पुण्यामध्येच महात्मा फुलेनी सुरु केलेल्या मुलींच्या शाळेसाठी पेशव्यांकडून २५रुपये दक्षिणा दिली जाते म्हणजेच पेशव्यांनी शिक्षणापेक्षा धार्मिक कृत्यावरच प्रचंड पैसा खर्च करून विषमता जोपासली होती म्हणूनच ब्राम्हणांना दक्षिणा वाटपाच्या संदर्भात टीका करताना श्री. वा. कृ. भावे आपल्या 'पेशवेकालीन महाराष्ट्र' या पुस्तकात लिहीतात, " ऑक्सफर्ड, केंब्रिज विद्यापीठांच्या धर्तीवर एक विश्वविद्यालय पेशव्यांना चालविणे शक्य होते. अशा विद्यापीठाचा परिणाम होऊन महाराष्ट्र युरोपियन राष्ट्रांच्या तोडीचा बनला असता." [८]

पेशव्यांच्या काळात सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक स्थिती अशा अवस्थेत होती. त्यात मुळीच बदल होत नव्हता त्याचे महत्वाचे कारण म्हणजे धर्मशास्त्रांची कडक बंधने. या सर्वांचा हिंदू समाजव्यवस्थेवरती परिणाम झाला. वर्णाश्रम धर्मपध्दतोमुळे

समाजातील जाती जातीत श्रेष्ठ कनिष्ठपणा निर्माण झाला. जातीतील श्रेष्ठ कनिष्ठता जन्माने ठरली. एक जात दुसऱ्या जातीशी बंधूभावाने न वागता दुसऱ्या जातीवरती बंधने लादू लागली. भावनात्मक एकात्मता नष्ट झाली, स्वत:च्या देशापेक्षा, राष्ट्रापेक्षा माणूस आपल्या जातीलाच मोठा मानू लागला. म्हणूनच पेशवाई बुडून ब्रिटीशांची सत्ता भारतात दृढ होण्यास मुत्सद्दी राजकारणापेक्षा धर्मकारणाचे वाढते प्राबल्य व जातीजातीतील संघर्ष कारणीभूत ठरले व यामुळे १८१८ साली पेशवाईचे समूळ उच्चाटन झाले.

## ४) ब्रिटीश कालीन शिक्षण

भारतातील शिक्षण प्रसाराच्या बाबतीत इंग्रजांचे धोरण दुटप्पी होते. युरोपीय समाज 'वर्गव्यवस्थेवरती' तर भारतीय समाज 'वर्ण जातीव्यवस्थेवर' आधारीत होता. याचा परिणाम भारतीय शिक्षण व्यवस्थेच्या उदयविकासावरती झाला. ब्रिटीश अर्थकारण व प्रशासन यासाठी भारतीय नोकरवर्गाची निर्मिती हे सरकारचे शिक्षण विषयक धोरण होते. तर 'स्वजात सिमीत नोकरभरतीची संधी' हे भारतीय अभिजन वर्गाचे शिक्षणविषयक धोरण होते.

माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनने १९ व्या शतकात राज्यातील देशी शाळांची पाहणी केली. त्याच्या अहवालानुसार,"राज्यात एकूण१,५०० शाळा व त्यामध्ये ३१,००० विद्यार्थी शिकत होते. या शाळांमध्ये मात्र अस्पृश्यांना प्रवेश नव्हता." 'ब्रिटीशांनी आपली नवी शिक्षण पध्दती ही सर्व भारतीयांच्या हिताची आहे असा समज पसरविण्यास सुरुवात केली. त्यामुळे त्यांची सत्ता स्थापन होताच शिक्षण त्यांनी औपचारिक दृष्ट्या सर्वांसाठी खुले केले. आपली राजवट ही पूर्वीच्या राजवटीपेक्षा अधिक कल्याणकारी व लोकहितकारी आहे हे जनमानसांमध्ये पसरविण्यांसाठी शिक्षण सर्वांसाठी खुले केले गेले.

१९ व्या शतकाच्या सुरुवातीला साऱ्या देशातीलच शिक्षणाची स्थिती अत्यंत शोचनीय होती. शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प होते. समाजात शिक्षणाविषयी कसलीही आस्था नव्हती. ब्राह्मणां शिवाय इतर जाती शिक्षणात रस घेत नव्हत्या. वाणी, सोनार, प्रभू या

जातीतील मुले काही प्रमाणात शिक्षण घेत असत. ब्राह्मणांचा चरितार्थ अध्ययन व अध्यापन या वरती आधारीत असल्याने त्या जातीची मुले शिकत होती. मागासजातीची मुले-मुली संख्येने अधिक होती पण धार्मिक रूढीच्या प्राबल्याने त्यांना शिक्षणापासून वंचित ठेवले होते. विद्यार्थी ब्राम्हण व शिक्षकही ब्राम्हण असल्यामुळे हे शिक्षण ब्राम्हणांचे धार्मिक तंत्र-मंत्र आले की शिक्षण संपले असा समज सर्वांचाच झाला होता. धार्मिक ग्रंथ ब्राह्मणेत्तरांनी वाचले तर निषिध्द मानून त्यांना कडक शिक्षा होत असे. त्यामुळेच ब्राम्हण पुरोहितांचा धार्मिक कृत्यांत, लग्नकार्यात सहभाग न घेता खालच्या जातीचेच पुरोहित नेमावयाचे असा जोतीबा फुल्यांनी आग्रह धरला. त्या कल्पनेलाही विरोध करण्यासाठी सारा ब्रम्हवृंद एक झाला. 'अशी लग्ने कायदेशीर नाहीत' असा निकाल रावबहादूर रानड्यांनी दिल्यामुळे ब्राम्हणांची हिंमत खूप वाढली.[१०] बहुजनांना शिक्षण देवूच नये यासाठी पुण्यामधील ब्राम्हण झुंडीने एकत्र होत असत.

पेशवाई बुडाल्यानंतर इ.स. १८२१ मध्ये पुना कॉलेज सुरु झाले. त्यामध्ये फक्त ब्राह्मणानांच प्रवेश होता. इ.स. १८३८ मध्ये हे धोरण बदलून ब्राह्मणेत्तरांनाही प्रवेश देण्याचे धोरण जाहीर झाले. तेंव्हाही ब्रम्हवृंदाने कोलाहल केला. पुण्यातील ब्राम्हण पंडित भीतीने व रागाने थरथरत होते. त्यांनी ब्रिटिशांच्या सरकारी धोरणाला कसून विरोध केला. ब्राह्मण शिक्षकांनी ब्राह्मणेत्तर विद्यार्थ्यांना संस्कृत शिकविण्यास नकार दिला. [११] ही शिक्षणविषयक स्थिती मागासलेल्या वर्गाची पुढारलेल्या पुण्यात होती. त्यामुळे इतर ठिकाणांच्या मागासवर्गीयांच्या शैक्षणिक स्थितीचे अनुमान न करणेच चांगले होते.

ब्राह्मणांनी ब्राह्मणेत्तरांना संस्कृत शिकवावे की नाही या विषयावरती ख्रिश्चनप्रणित 'ज्ञानोदय' आणि पुणेकर प्रणित 'ज्ञानप्रकाश' मध्ये चांगली जुगलबंदी झाल्याचे दिसते. ज्ञानोदयने पुणेकर ब्राम्हणांना बजावले,

" सार्वजनिक पैशातून आपली शिक्षण व्यवस्था व्हावी आपणच देवाचे लाडके आहोत, नव्हे भूदेव आहोत असे म्हणणे, अशा कल्पनेत दंग होण्याचे दिवस आता राहिलेले नाहीत."[१२]

ब्रिटीश राजवटीमध्ये सुध्दा धार्मिक कायद्यांचा आधार घेवून ब्राह्मणेत्तरांच्या वरती शैक्षणिक मक्तेदारी गाजविण्याचे काम बह्मवृंदाकडून केले गेले. १८३५ मध्ये लॉर्ड मेकॉलेने भारतीय शिक्षणावरती अहवाल मांडला. या अहवालात त्याने संस्कृत सहीत भारतातील अभिजन भाषांची टिंगल उडविली आहे. तो म्हणतो,

"भारतातील संपूर्ण साहित्य हे युरोपमधील एका ग्रंथालयातील एका कपाटातील ग्रंथाएवढेच मुल्यवान आहेत."[१३] या अहवालात मेकॉले पुढे म्हणतो, रंग व रक्ताने भारतीय पण चारित्र्य व मतप्रणाली यात वृत्तीने इंग्रजी अशा व्यक्तींचा वर्ग तयार करुन आपण त्या लक्षावधीवर सत्ता गाजवतो. त्यांच्यातील व आपल्यातील दुवा म्हणून निवडक ऐतद्देशियांना शिक्षित करायला हवे.[१४] मेकॉलेच्या या अहवालावरुन स्पष्ट होते की संपूर्ण भारतीयांना शिक्षित करणे हे ब्रिटीशांचे उद्दिष्ट नव्हते तर त्यांना शिक्षित ऐतद्देशियांचा केवळ 'निवडक' ब्रिटीश अभिरुची असणारा व ब्रिटीश राज्यकारभारात मदत करणारा वर्गच दुय्यम कारकूनांचा वर्गच तयार करायचा होता. या त्याच्या दूरदृष्टीमध्ये अस्पृश्य किंवा मागासवर्गीय समाजाला शिक्षण देण्याचा हेतू नव्हता.त्यांचा उद्देश भारतीय समाजस्थिती सुधारण्यासाठी शैक्षणिक बदल करण्यापेक्षा आपणास आवश्यक कमी पैशात राबणारा भारतीय कारकूनांचा वर्ग निर्माण करून व्यवस्थापनाचा खर्च कमी करावयाचा होता.

## ४.१ मिशनऱ्यांचे शैक्षणिक कार्य

ब्रिटीश राजवटीत भारतीय शिक्षणाची दिशा ठरत असतानाच भारतीय लोकांच्या जीवनात मिशनऱ्यांचे आगमन हे महत्वाचे ठरते. सेवाभावीवृत्ती व शिक्षणप्रसार या दोन साधनांच्या मदतीने मिशनऱ्यांनी भारतीय समाजात मान्यता मिळविली. धर्मप्रचार व प्रसार हे जरी त्यांचे उद्दिष्ट असले तरी धर्म प्रचाराबरोबरच शाळा स्थापन करुन समाजाशी

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR
SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

नातेजोडण्याचे मोठे काम मिशनऱ्यांनी केले. १८१५ मध्ये अमेरिकन मिशनरी सोसायटीने मुंबईत सुरु केलेल्या शाळेचे स्वरुप पाश्चिमात्यांच्या स्वरूपासारखे होते.

"१८२४ मध्ये या अमेरिकन मिशनऱ्यांनी मुलींसाठी स्वतंत्र शाळा काढून मुंबई प्रांतात आधुनिक स्त्रिशिक्षणाचा श्री गणेशा केला."[१५]

पुढील २ वर्षात मुलींच्या शाळेची संख्या ९ पर्यंत वाढली मात्र खास अस्पृश्यांसाठी स्वतंत्र शाळा उघडण्याचे धाडस १८५५ पर्यंत सरकारने किंवा मिशनऱ्यांनी केले नाही. मिशनऱ्यांना सरकारी तिजोरीतूनच पगार मिळत असलेने त्यांच्यावरती सरकाराचा नैतिक दबाव होता. शिक्षण देण्यासाठी शाळा उघडण्याचे सत्र सुरु झाले पण अस्पृश्यांसाठी नाही कारण, स्पृश्य लोकांना शिक्षण देऊन त्यांना पुढे आणावे व त्यांचा उपयोग आपला राज्यकारभार सुरळीतपणे चालविण्यात करावा. अस्पृश्यांना शाळेत येऊ दिले तर कदाचित उच्चवर्णीय हिंदू लोक अस्पृश्यतेच्या भीतीने व धर्म भ्रष्ट होईल या भावनेने आपली मुले शाळेत पाठविणार नाहीत व मग आपल्या राज्य कारभारास हातभार लावणारा कारकूनांचा वर्ग आपल्याला निर्माण करता येणार नाही. त्याचप्रमाणे अस्पृश्यांच्या मुलांना शिकवून तयार केले तर त्यांना सरकारी कारभारात पदाधिकारी म्हणून नेमावे लागले व त्यामुळे हिंदू लोक चिडून जातील व नीच जातीतील लोकांना आमच्यावरील अंमलदार करुन आमची अवहेलना करीत आहेत अशी विचार जागृती हिंदूच्यामध्ये उत्पन्न होईल व त्यानंतर मन प्रक्षोभामुळे हिंदूलोक राजाविरुध्द बंडाळी करतील ही भीती कंपनी सरकारला रात्रंदिवस भेडासावीत होती म्हणून सरकारने अस्पृश्यांना शिक्षणापासून अगदी दूर ठेवण्याचे धोरण स्वीकारले होते. [१६] मुंबई इलाख्यातील धारवाड या शहरातील स्थिती ही प्रत्यक्षदर्शी होती. एका महार मुलाने धारवाड येथील सरकारी हायस्कूलमध्ये प्रवेश मिळविण्यासाठी १८५६ च्या जूनमध्ये सरकारकडे अर्ज केला तेव्हा त्याला प्रवेश द्यावा की नाही या बद्दल मुंबई सरकारने लंडन येथील बोर्ड ऑफ डायरेक्टर्सकडे पत्रव्यवहार केला तेव्हा, "सदर महार विद्यार्थ्याला प्रवेश दिला तर वरिष्ठ वर्गातील मुलांचे पालक व आईबाप धारवाडचे

हायस्कूल विटाळले असे समजून आपली मुले हायस्कूलमधून काढून घेतील व शिवाय सरकारविरुध्द वरिष्ठ हिंदूंचे मत वाईट होईल ही परिस्थिती राज्य कारभाराला घातक होईल म्हणून महार मुलाला प्रवेश नाकारावा असा डायरेक्टर्सनी निर्णय घेतला व मुंबई सरकारने तो अंमलात आणला." [१७]

उच्चवर्णीयांना शिक्षण द्यावे व अस्पृश्यांना देवू नये. राज्यकारभारात उच्चवर्णियांना अडचणी निर्माण होणार असतील तर अस्पृश्यांना शिक्षण नाकारणे हे सरकाराचे सोयीचे धोरण होते. अशा प्रकारचे सरकारी धोरण असूनही या कालखंडात मिशनऱ्यांनी धर्मप्रसाराच्या अंतस्त हेतूने शाळा काढल्या. त्यामुळे १८३० ते १८५७ हा मिशनऱ्यांनी काढलेल्या शाळांचा कालखंड म्हणून ओळखला जातो. [१८]

## ४.२ १८१३ चा चार्टर ॲक्ट

१८१३ च्या चार्टर ॲक्ट मध्ये शिक्षणाबाबत पुढील तरतूद केली.

It shall be lawful for the governer General in council to direct that ...... a sum of not to less than one lakh rupees in each year shall be set a part applied to the revival & improvement of literature & the encouragement of the learned native of India, and for the introducticn & promotion of a knowledge of the sciences among the inhabitants of the British territories in India.

भारतीय शिक्षणासाठी ग.ज.च्या कौन्सीलने १ लाख रुपये खर्च करण्याचे ठरवले होते. त्यामुळेच १९२२ मध्ये बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी स्थापन झाली. या अनुषंगाने मिशनऱ्यांनी भारतात विशेष करुन महाराष्ट्रात शाळा सुरु करण्यास सुरुवात केली. प्राथमिक शाळा विशेष करुन खेड्यात चालू केल्या. १८३६ मध्ये पहिले वसतिगृह महाबळेश्वर येथे मेरी ग्रेव्हज या स्त्रीने उघडले तर माध्यमिक शाळेची स्थापना १८७०

मध्ये सेलर याने केली.[१९]

भारतीय शिक्षणाचा विकास ख्रिश्चन तत्वाप्रमाणे व्हावा अशी मिशनऱ्यांची इच्छा होती.[२०] एकूणच स्वकीय लोक धर्मबंधनामुळे अस्पृश्यांना शिक्षण देण्यास जिथे नाखूष होते, तिथे ख्रिश्चन धर्म प्रसाराच्या अपेक्षेने का असेना ख्रिश्चन मिशनऱ्यांनी अस्पृश्यांना जवळ करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. यामुळे बहुतांश अस्पृश्य हिंदू आपला धर्म सोडून ख्रिश्चन धर्मात गेले. १९०१ साली झालेल्या जनगणनेत १८९१-१९०० या दहा वर्षात ६,२७,७५९ लोकांनी ख्रिश्चन धर्म स्वीकारला.[२१]

## ४.३ एल्फिन्स्टनचे धोरण

१८१९ ते १८२७ या कालखंडामध्ये मुंबईचे गव्हर्नर एल्फिन्स्टनने मिशनऱ्यांबाबत कडक धोरण स्वीकारले. शाळामधल्या ख्रिस्ती शिक्षणामुळे निर्माण होणारे धोके ओळखून त्याला पायबंद घालण्याचा दूरदर्शीपणा दाखविला. उदार आणि वस्तूनिष्ठ धोरण स्वीकारुन प्रशासन करण्याचा प्रयत्न केला गेला. ऐतद्देशियांना शिक्षित करण्याचा त्याने प्रयत्न केला. या देशी लोकांना शिक्षण दिल्यामुळे त्यांच्यामध्ये जागृती घडून येईल व तेच लोक आपली हकालपट्टी करतील याची जाणीव एल्फिन्स्टनला असताना सुध्दा त्यांने गरीब, अज्ञानी प्रजेला शिकविण्याचा मोठा धाडसी प्रयत्न केला. पण ब्राम्हणेत्तरांच्या शिक्षणाबावत एलफिन्स्टन थोडा घाबरुन होता. याबाबत त्याचे असे मत होते की, 'आपल्या राज्यकारभारास उपयुक्त माणसे तयार करण्याच्या हेतूने प्रजेत शिक्षण प्रसार करणे, त्यासाठी शिक्षण देण्याचे कार्य एलफिन्स्टनने हाती घेतले. परंतू शिक्षणदानात ब्राम्हणेत्तर लोक गोवले तर ब्राम्हण लोक खवळतील कारण की विद्याभ्यास करणे हे फक्त ब्राम्हणांचे कर्तव्य ब्राम्हणेत्तरांचे नाही ही हिंदूमधील विचारसरणी त्याला माहीत होती. म्हणून ब्राम्हण लोकांना असंतुष्ट करु नये यासाठी त्याने प्रथम ब्राम्हणांमध्ये विद्यादान झाले पाहिजे असे आपले मत सरकारला (विलायतेस) कळविले ब्राम्हणेत्तर जातीत विद्यादान करणे पुढे पहाता येईल.[२२]

अशा प्रकारचे अस्पृशांच्या शिक्षणाबाबत दिरंगाईचे धोरण गव्हर्नर एल्फिन्स्टनने स्वीकारल्याचे दिसते. कारण अस्पृशांना शिक्षण देऊन इतर उच्च वर्णिय समाजाला दुखावून आपल्या राज्यावर संकट ओढावून घ्यायचे नव्हते.

१८१३ सालच्या चार्टर ॲक्टमुळे कंपनीने प्रजेच्या शिक्षणासाठी वर्षाला १ लाख रुपये खर्च करावेत असे सुचविले व त्यामुळे १८२२ साली मुंबई प्रांतासाठी 'बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी' स्थापन झाली असली तरी येथेही उच्चवर्णीय वर्गाचीच मक्तेदारी असल्याचे दिसते. १८५४ साली शिक्षण क्षेत्रात महत्वाची कामगिरी बजावणारा वुडचा खलिता तर १८८२ साली हंटर कमिशन अहवाल आला असला तरी अस्पृश्य समाजाच्या शिक्षणाची वाताहतच होत होती. म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी १९२४ साली स्थापन केलेल्या बहिष्कृत हितकारिणी सभे तर्फे सायमन कमिशनपुढे २९ मे १९२८ सादर केलेल्या अहवालात १८८१-८२ सालापर्यंत शिक्षणाची प्रगती किती झाली हे दाखवून दिले. [२३]

*तक्ता क्र.१*

*१८८१-८२ सालातील शिक्षणाची प्रगती दाखविणारा अहवाल*

| जाती | विद्यार्थी संख्या | | |
|---|---|---|---|
| | प्राथमिक शाळा | इंग्रजी शाळा | कॉलेज |
| १) ख्रिस्ती | १५२१ | १४२९ | १४ |
| २) ब्राह्मण | ६३०७१ | ३६३९ | २४१ |
| ३) इतर हिंदू | २०२३४५ | ६२४<br>३८२३ | १०८ |
| ४) मुसलमान | ३९२३१ | ६८७ | ७ |
| ५) पार्शी | ३५१७ | १५२६ | १०८ |
| ६) वन्यजाती | २७१३ | ६ | ० |
| ७) अस्पृश्य | २८६२ | १७ | ० |
| ८) ज्यू व इतर | ३७३ | १०३ | २ |

वरील आकडेवारी पाहता कॉलेजमध्ये जाणाऱ्या अस्पृश्य विद्यार्थ्यांची संख्या 'शून्य' दिसते. तर इतर उच्च जातींच्या मानाने अस्पृश्यांची प्राथमिक व इंग्रजी शाळातील संख्याही नगण्यच दिसते. यावरुन ब्रिटिशांचा सुद्धा अस्पृश्य विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन सकारात्मक नव्हता असे दिसते.

१८५८ मध्ये भारतात विद्यापीठांची स्थापना करण्यात आली होती. प्राथमिक शिक्षण सर्व जातीजमातींना १९ व्या शतकाच्या सुरुवातीलाच खुले करणाऱ्या ब्रिटीशांनी विद्यापीठीय शिक्षण सर्व जातींना खुले राहील हा आदेश विद्यापीठ स्थापनेच्या २४ वर्षांनी म्हणजे १८८२ मध्ये काढला गेला.अशाप्रकारे एकंदरीत १८५७ पर्यंतचा ईस्ट इंडिया कंपनीच्या अंमलाखालील शैक्षणिक इतिहास पाहिला मागासवर्गियांच्या शिक्षणाकडे हेतुपूर्वक दुर्लक्ष झाले तर इंग्रजी शिक्षणामुळे नवशिक्षितांचा एक वर्ग उदयास आला होता. ब्रिटिशांच्या पारतंत्र्याची जाणीव त्यांना होवू लागली होती व याच वर्गाने ब्रिटिश सत्तेला १८५७ मध्ये सुरुंग लावण्याचा अयशस्वी प्रयत्न केला.

## मागासवर्गीयांच्या शिक्षणासाठी प्रयत्न करणारे ऐतद्देशीय

### १. महात्मा फुलेंचे शैक्षणिक कार्य

महात्मा जोतिराव फुले हे सामाजिक समतेच्या चळवळीचे आद्यप्रवर्तक म्हणून उदयाला आले. स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, प्रतिष्ठा या थॉमस पेनच्या विचारसरणीचा प्रभाव महात्मा फुलेंच्यावरती पडला होता. ज्यांचा काहीही अपराध नसताना शेकडो वर्षे समाजातील अस्पृश्य, मागास लोकांचा छळ येथील उच्चवर्णीयांकडून झाला व होत होता त्यातून त्यांची सुटका करण्यासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घातले. फुल्यांनी आपल्या कार्याने, वाणीने व लेखणीने सनातन्यांच्या वरती घणाघाती प्रहार केले. म्हणूनच बहुजन समाजाच्या दु:खाची कारणमीमांसा सांगताना ते म्हणतात,

"विद्येविना मति गेली,मती विना नीती गेली,नीतिविना गति गेली,
गतिविना वित्त गेले, वित्ताविना शुद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले"

त्यामुळेच या अविद्येच्या गर्तेतून ब्राह्मणेत्तरांना बाहेर काढण्याचे कार्य त्यांनी आपले जीवित

कार्य म्हणून अवलंबिले. महात्मा फुलेंनी आपली पत्नी सावित्री आणि निवडक सहकाऱ्यांच्या मदतीने महाराष्ट्रातील या दुबळ्या समाजाचे अज्ञान दूर करण्याचा प्रयत्न केला.पुण्यासारख्या तत्कालीन प्रतिगामी विचारांच्या पेशवाईच्या बालेकिल्ल्यात दीन-दुबळ्या, शुद्रातीशुद्रांना शिक्षण देण्याचे प्रयत्न करणे हे अत्यंत अवघड काम होते. शुद्रांतीशुद्रांना भट ब्राम्हणांच्या वर्चस्वाच्या मगरमिठीतून सोडविण्यासाठी जे पुरोगामी कार्य हाती घेतले होते. त्यासाठी त्यांना वडिलांचे घर सोडावे लागले. दारिद्र्यात राहून कष्ट उपसावे लागले. शिक्षण हेच समाजपरिवर्तनाचे धारदार व प्रभावी हत्यार आहे त्याला दुसरा कोणताही पर्याय नाही.या विचारांवरती त्यांची अढळ निष्ठा होती. यापासून त्यांनी कधीही फारकत घेतली नाही. तळागाळातील सामान्य माणसांची ञडी बसविताना स्वत:च्या प्रपंचाची घडी विस्कटली, पण ती सुद्धा आनंदाने स्वीकारली. ख्रिस्ती धर्मोपदेशकांनी चालविलेल्या वसतिगृह शाळेत त्यांनी काही वर्षे शिक्षकांचे काम केले. अहमदनगर येथे अमेरिकन मिशनने सुरु केलेल्या फारार मॅडमच्या कन्या शाळा पाहून महात्मा फुलेंना प्रेरणा मिळाली आणि पुण्यात परत येऊन लहूजी मांग, राणबा म्हार यांच्या मदतीने सदाशिव बल्लाळ गोवंडे यांच्या सहकार्याने १८४८ साली पुण्यात मुलींची पहिली शाळा स्थापन केली गेली.

महार-मांग इत्यादी लोकांना विद्या शिकविण्यासारखे पवित्र काम दुसरे कोणतेही नाही असे महात्मा फुलेंना वाटत असलेमुळे त्यांनी व त्यांच्या मित्रांनी महार-मांगांना शाळा शिकविण्याचे ठरविले व काहीं लोकांना या कामी सहभागी करून घेतले व आपले शैक्षणिक कार्य पुढे नेले. त्यांच्या शैक्षणिक संस्थेत व कार्यात त्यांना सहकार्य करणारे काही निवडक सहकारी खालील प्रमाणे, [२४]

सदाशिव बल्लाळ गोवंडे - मुख्यस्थानी
मोरो विठ्ठल वाळवेकर - चिटणीस
सखाराम यशवंत परांजपे - खजिनदार
जोतिराव गोविंदराव फुले - सभासद
बाबाजी मनाजी डेंगळे - सभासद

१८४८ हे वर्ष भारताच्या इतिहासातच नव्हे तर जगाच्या इतिहासात क्रांती करणारे होते. कारण शोषित मानवांच्या मुक्तीचा कार्ल मार्क्स यांचा कम्युनिस्टांचा जाहीरनामा याचवर्षी प्रसिद्ध झाला. ब्राह्मणवादावरती प्रहार करणारी आणि नवविचारांचा प्रसार करणारी लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांची लेखमाला याचवर्षी प्रसिद्ध झाली. हा विचार यामागे होता महात्मा फुलेंनी १८४८ साली मुलींची पहिली शाळा पुण्यातील बुधवार पेठेत सुरु केली आणि १८५२ साली महार मांग जातीच्या मुलांसाठी पुण्यात भोकरवाडी येथे शाळा सुरु केली. या मुलामुलींना शिक्षण देण्याची जबाबदारी स्वत: महात्मा फुले व सावित्रीबाईंनी उचलली. स्त्रियांना गुलाम बनविणारी समाजव्यवस्था ईश्वरनिर्मित नसून मानवनिर्मित आहे व याचे उकल होण्यासाठी अज्ञानी लोकांना शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही. यावरती शिक्षण हेच एकमेव असे प्रभावी साधन आहे की, ज्यामुळे स्त्री, शुद्रातीशुद्रांना गुलामीतून मुक्त करता येईल.

सावित्रीबाईंना स्त्री शिक्षणाकरिता शिकविण्याचे काम जोतिरावांचे मित्र सखाराम यशवंत परांजपे आणि केशव शिवराम भवाळकर यांनी स्वीकारली होती. ती त्यांनी यशस्वीरित्या पार पाडली असे दिसते. [२५]

१८५२-५३ च्या बोर्ड ऑफ एज्युकेशनच्या अहवालात स्वत: जोतिराव फुले मुलींच्या शाळेत रोज चार तास शिकवित असत असे दिसते. सावित्रीबाई फुले यांना शाळेत जाताना नतद्रष्ट लोकांनी शेण, दगड गोटे मारले होते. तरीही निश्चयापासून सावित्रीबाई फुले ढळल्या नाहीत.जोतिराव फुलेंच्या विचार व कृतीने शिक्षणात अमुलाग्र बदल होवू लागला. प्रतिगाम्यांच्या अनेक अडथळयांना पार करत समाजपरिवर्तनाचे कार्य फुले दांपत्यांनी कायम व निष्ठेने केले. सनातन्यांच्या प्रतिगामी विचारावरती प्रहार करण्याचे कार्य फुलेंनी केले. शिक्षणाचे उद्दिष्ट सांगताना फुले म्हणतात,

" स्वार्थावरती नजर ठेवून शोषित, पीडित जनतेकडे पाठ फिरवून आपले पांडित्य मिरवीत असतील तर अशा शिक्षितांपासून समाजाला काहीही लाभ होणार नाही. शिक्षणाने

पदवी मिळेल. कदाचित नोकरी व सन्मानही मिळेल, परंतु ही शिक्षणाची इतिकर्तव्यता नाही. शिक्षणाची फलश्रुती सर्व समतेच्या आणि मानवी स्वातंत्र्य आणि हक्कांच्या लढ्यांची सिद्धता करण्यात आहे." [२६]

## १.९ मागासवर्गीय शिक्षणासंबंधी महात्मा फुलेंची हंटर आयोगापुढील साक्ष

१८८२ साली हंटर आयोगापुढे सादर केलेल्या निवेदनात महात्मा फुलेंनी शिक्षणाची सविस्तर चर्चा केली आहे.जातीपातीच्या पूर्वग्रहदुषित दृष्टीकोनामुळे इतर वर्गाच्या बरोबरीने वर्गात बसण्याची परवानगी मिळत नाही म्हणून महार, मांग आणि इतर कनिष्ट वर्ग यांना या शाळांतून जवळजवळ मज्जावच झालेला आहे. परिणामी सरकारला त्यांच्यासाठी खास शाळा उघडाव्या लागतील. [२७]

जे जे आपणासी ठावे ते ते इतरांशी सांगावे ।

शहाणे करुनी सोडावे सकलजण ।

या संत तुकारामाच्या वचनाप्रमाणे इथला ब्राह्मण वर्तन करीत नसल्याने आजची स्थिती निर्माण झाली आहे.त्यासाठी प्राथमिक शिक्षण सर्वांना सक्तीचे व मोफत झाले पाहिजे यावर भर देऊन ते म्हणाले,

"प्राथमिक शाळांतील शिक्षक हे प्रशिक्षित असले पाहिजेत तसेच ते शक्यतो शेतकरी वर्गापैकीच असले पाहिजेत. ब्राम्हण वर्गातले शिक्षक धार्मिक पुर्वग्रहांमुळे कनिष्ट वर्गीयांशी फटकून वागतात. शेतकरी वर्गातले शिक्षक त्या वर्गात चांगल्या रितीने समरस होतील. प्रसंगी नांगराची लुमणी किंवा सुताराची तासणी हाती घेण्यात त्यांना कमीपणा वाटणार नाही. समाजातील कनिष्ठ थरांशी ते तत्परतेने एकरुप होतील. अभ्यासक्रमातही शेतकी व आरोग्य यांच्या मुलभूत ज्ञानाचा अंतर्भाव केला पाहिजे." [२८] बहुजन समाजातीलच शिक्षक असावेत असा आग्रह फुलेनी धरलेला दिसतो.

स्थानिक कराच्या निधीपैकी निम्मा निधी केवळ प्राथमिक शिक्षणावरती खर्च

करावा अशा सूचना त्यांनी केल्या. त्याचबरोबर स्त्रियांच्या प्राथमिक शिक्षणाचा प्रसार आणखी मोठ्या प्रमाणावरती होईल अशा प्रकारच्या उपाययोजनांना संमती द्यावी अशी विनंती सुद्धा हंटर कमिशनला त्यांनी केली.

उच्च शिक्षणाची तळागाळातील समाजाची स्थिती तर अत्यंत शोचनीय होती उच्चशिक्षणाबाबत म.फुले म्हणतात,

"शिक्षणपद्धतीत उच्च शिक्षणावरती वारेमाप खर्च केला जात असून तो फक्त ब्राम्हणांना आणि उच्चवर्णियांनाच सुशिक्षित बनविते व सर्व सामान्य लोकांना अज्ञानाच्या आणि दारिद्र्याच्या खातेऱ्यात लोळत ठेवते." [२९] महात्मा फुले उच्च शिक्षणाबाबत आपले मत मांडताना म्हणतात,

"प्रजाजन शासनाखालील एक वर्गच्या वर्ग संपूर्णपणे दुर्लक्षीला जात असलेने अन्य प्रगत वर्गाबरोबरच या उपेक्षित वर्गाच्याही प्रगतीची तितकीच आस्था सरकारने दर्शविली पाहिजे. हिंदूस्थानातील शिक्षण अद्यापही बाल्यावस्थेत आहे. उच्चशिक्षणार्थ दिले जाणारे अनुदान थांबविण्यात ते ही एकंदर शिक्षण प्रसाराच्या दृष्टीने विघातकच ठरेल." [३०] पुढे ते यातील धोके सांगताना म्हणतात की,

"सरकारी महाविद्यालयातून दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचे स्वरुप सर्वसाधारण जीवनातील गरजा भागविण्याच्या दृष्टीने उपयोगी ठरावे असे व्यावहारिक नाही. कारकून आणि शिक्षक मोठ्या प्रमाणावर पैदा होण्यास मात्र ते उपयुक्त ठरणारे आहे." [३१]

या शिक्षण विषयक मूलगामी विचारांची पुसटशी दखलही ३ वर्षांनी म्हणजे १८८५ साली स्थापन झालेल्या राष्ट्रीय कॉंग्रेसच्या ध्येय उद्दीष्टांमध्ये नव्हती. महात्मा फुलेंच्या शैक्षणिक सूचनांचा साधा उल्लेख ही केला गेला नाही. यावरुन भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस ही मुठभर उच्चभ्रू लोकांची राजकीय संघटना होती. त्यामुळे मागासवर्गीय समाजाच्या शिक्षणाबाबत एक अवाक्षरही कॉंग्रेसने काढलेले दिसत नाही. यावरून राष्ट्रीय कॉंग्रेसने सुरवातीच्या काळात मागासवर्गीय शिक्षण व त्या अनुषंगाने सामाजिक व राजकीय प्रगती

याकडे लक्ष दिल्याचे आढळत नाही.

अशा प्रकारे विविध स्तरावरील शिक्षणासंबंधी वैशिष्ट्यपूर्ण भूमिका म.फुलेंनी वटविलेली दिसते. म.फुलेंच्या नंतरच्या काळात न्या.रानडे, आगरकर, धोंडो केशव कर्वे, पंडिता रमाबाई, म.गांधी यांनी स्त्रियांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न केले पण ज्यावेळी स्त्रियांच्या हक्कासाठी, उद्धारासाठी त्याग करणाऱ्या आणि कष्ट भोगणाऱ्या जोतिरावांचा ' स्त्रियांचा उद्धारकर्ता ' म्हणून सत्कार झाला त्यावेळी न्यायमूर्ती रानडे १० वर्षाचे होते. विष्णू शास्त्री चिपळूणकर २ वर्षाचे होते. गोपाळ गणेश आगरकर, महर्षी कर्वे, पंडिता रमाबाई व म.गांधी यांचा जन्मसुद्धा झाला नव्हता. या दृष्टीकोनातून मागासवर्गीय व स्त्रियांच्या शिक्षणासंबंधीची मूलभूत विचार मांडणारे व कार्य करणारे महात्मा फुले हे पहिले भारतीय होते. त्यांच्या पाऊल खूणांवरच छत्रपती शाहू महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या शैक्षणिक विचारांची बैठक तयार केली.

## २. गोपाळबुवा कृष्णा वलंगकर यांचे कार्य

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक कार्याच्या पुर्वी महात्मा फुलेंच्या प्रेरणेने अस्पृश्य समाजामध्ये जागृती करण्याचे काम गोपाळ बुवा वलंगकर यांनी केले. महाडपासून ५ ते ७ मैल अंतरावर असणाऱ्या 'रावदूल' या खेडे गावचे ते होते. पलटणीत भरती झाली आणि शिक्षणाचा श्रीगणेशा तेथेच झाला.रामानंदी पंथाचा त्यांनी स्वीकार केला.वलंगकरांनी हिंदू धर्मशास्त्रे व पुराणे यांचा उत्तम अभ्यास केलेला होता. वलंगकरांची पलटण जेव्हा पुणे, मुंबई येथे येईल तेव्हा ते महात्मा फुले व त्यांचे सहकारी यांच्याशी पुराणे, शास्त्रे, जातीभेद, इ. विषयांवर चर्चा करीत. महात्मा फुलेंची धारदार लेखनशैली व विचारसरणी त्यांनी अनुसरली होती.

१८८६ साली हवालदार म्हणून पलटणीतीलनोकरीतून पेन्शन घेऊन दापोली येथे आले. आणि येथून त्यांनी आपली चळवळ सुरु केली. सवर्ण हिंदू आर्य व अस्पृश्य लोक अनार्य आहेत अशी त्यांची समजूत होती. अस्पृश्यतेचा कलंक दूर केला तरच

आपली प्रगती होवू शकते यावर त्यांचा विश्वास होता. अस्पृश्यता निवारण्याची चळवळ चालविण्यासाठी त्यांनी दापोली येथे 'अनार्य दोष परिहार समाज' स्थापन केला. व महाराष्ट्रभर अस्पृश्यांना हक्काबद्दल जागृत केले. 'सुधारक' व 'दिनबंधू' या वर्तमान पत्रातून अस्पृश्यांच्या हक्क अधिकाराबद्दल लेख सुद्धा प्रसिद्ध करीत असत.

१८५७ च्या उठावापुर्वी कंपनी सरकाराने पलटणींमध्ये अस्पृश्या सहीत सर्व सैनिकांना शिक्षण सक्तीचे केले होते. पण उठावानंतर ब्रिटिश अंमल सुरु झाला.हिंदुस्थानातील पलटणी संबंधीची चौकशी करण्याकरीता एक चौकशी समिती नेमली या कमिशनपुढे अनेकांनी साक्षी दिल्या त्यात त्यांनी म्हटले,

"लोकांना विद्यादान केले तर ते शहाणे होतील व ते सरकारला डोईजड व त्रासदायक होतील." या साक्षीप्रमाणे सरकारने सैन्यातील सक्तीचे शिक्षण बंद केले. त्यामुळे सरकारी शिक्षणाचा सहज मार्ग मागासवर्गीयांना बंद झाला. तत्पुर्वी मात्र पलटणीतील अस्पृश्य लोकांत शिक्षणाचा प्रसार झाला होता पण पुर्ववत हे शिक्षण मिळाले पाहिजे व त्यांना सैन्यात भरती करुन घेतले पाहिजे. महादेव गोविंद रानडे यांच्या सहाय्याने सरकारकडे एक अर्ज 'अनार्य दोष परिहार समाज ' या संस्थेद्वारे देण्याचा पहिला प्रयत्न गोपाळबुवा वलंगकर यांनी केला.

हिंदु धर्मशास्त्रांची लबाडी सिद्ध करण्यासाठी वलंगकरांनी ५० पानांचे 'विटाळ विध्वंसन' हे पुस्तक १८८८ मध्ये प्रकाशित केले.या पुस्तकात अस्पृश्यता व जातीभेद यावरती प्रकाश टाकलेला आहे.गोपाळबुवा वलंगकरांचा मृत्यू १९०० साली रावदुल येथे झाला.[३२]

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळींची वैचारिक पार्श्वभूमी महात्मा फुलेंनी तयार केली होती. पण अस्पृश्य समाजामध्ये प्रत्यक्ष संघर्षासाठी जागृती करण्याचे काम करणारे गोपाळबुवा वलंगकर हे पहिले अस्पृश्य होत. यांचाही प्रभाव पुढे डॉ.आंबेडकरांच्या सामाजिक, शैक्षणिक चळवळीवरती पडलेला दिसतो. त्यामुळे आंबेडकर विचार प्रवाहातील

मैलाचा दगड म्हणून गोपाळबुवा वलंगकर यांचे नांव घेणे क्रमप्राप्त ठरते.

## ३. शिवराम जानबा कांबळे यांचे कार्य

महात्मा फुले आणि गोपाळबुवा वलंगकरांच्या अस्पृश्यता निवारण्याच्या कार्याने प्रभावीत झालेले शिक्षण विषयक विचार मांडणारे मागासवर्गीय नेतृत्व म्हणजे शिवराम जानबा कांबळे. 'पुणे' हे त्यांचे मुळ गांव वयाच्या १० व्या वर्षी म्हणजे १८८५ साली त्यांनी शिक्षणास सुरुवात केली. लोकहितवादी, आगरकर व महात्मा फुले याचे लेख व पुस्तकांचे वाचन शिवराम जानबा कांबळे यांनी केले होते.आणि यातूनच त्यांचा अस्पृश्यांच्या सुधारणे बद्दलचा दृष्टीकोन तयार झाला.

कोल्हापुरातून प्रसिद्ध होत असलेल्या 'मराठा दिनबंधू' या पत्रात शिवराम जानबा कांबळे यांचा ऑक्टोबर १९०२ मध्ये लेख प्रसिद्ध झाला होता. या लेखात अस्पृश्यता निवारणाबद्दल व सामाजिक अंधश्रध्देबद्दल जागृतीचे काम त्यांनी केले. आपल्या लोकांना लष्कर व पोलिस खात्यात नोकऱ्या मिळाव्यात व मुलामुलींचे शिक्षण सरकारने पत्करावे यासंबंधी सरकारला जाहीर विनंती करण्यासाठी त्यांनी सासवड येथे २४/११/१९०२ ला ५१ गावच्या महार लोकांची सभा भरविली व अस्पृश्यांच्या हितासाठी सरकारने काय केले पाहिजे. याबद्दलचा चर्चा करणारा अर्ज शिवराम जानबा कांबळे यांनी तयार केला व त्यावरती १५८८ महारांच्या सह्या घेतल्या व तो अर्ज सरकारकडे पाठविला. अस्पृश्यातर्फे सरकारला गेलेला हा पहिलाच अर्ज होय'' [३३]

१ जुलै १९०८ रोजी शिवराम जानबा कांबळे यांनी 'सोमवंशीय मित्र' हे मासिक सुरु करुन सामाजिक चळवळीतील समस्यांना वाचा फोडली. या मासिकातून अस्पृश्य वर्गाच्या शैक्षणिक धार्मिक सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी अनेक लेख लिहिले.पुणे येथे १९०४ साली सहकार्यांच्या सहाय्याने 'श्री शंकर प्रासादिक सोमवंशीय हितचिंतक मित्र समाज' ही संस्था स्थापन केली आणि 'श्री सचितानंद वाचनगृह' उघडले. या विविध कामाद्वारे शिवराम जानबा कांबळे यांच्या कार्याचा अप्रत्यक्ष प्रभाव डॉ. बाबासाहेब

आंबेडकरांची शैक्षणिक विचारांची बैठक तयार होण्यासाठी झाला.

### ४. विठ्ठल रामजी शिंदे

अस्पृश्योद्धाराचे काम अत्यंत चिकाटीने करणारे दुसरे लढवय्ये म्हणजे विठ्ठल रामजी शिंदे. यांचा जन्म जमखंडी येथे २३ एप्रिल १८७३ रोजी मराठा कुटुंबात झाला. शिक्षण संपादन करीत असतानाच ब्राम्हो समाजाशी त्यांचा संबंध आला होता. महाराष्ट्रातील सामाजिक, राजकीय ,शैक्षणिक व संस्कृतिक चळवळीचा त्यांनी अभ्यास केला होता. यातून त्यांची विचारसरणी तयार झाली आणि अस्पृश्य व तळागाळातील लोकांच्या सेवेसाठी मिशनऱ्यांच्या धर्तीवर कार्य करण्याचे ठरवले. सारा भारत भ्रमण केला, अस्पृश्य स्थितीची सूक्ष्म पहाणी केली आणि १८-१०-१९०६ रोजी न्यायमुर्ती नारायण चंदावरकर यांच्या अध्यक्षतेखाली 'डिस्प्रेड क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडिया ' संस्था स्थापन केली गेली. आणि याद्वारे अस्पृश्यांचे अनेक प्रश्न सोडविण्याचे काम केले.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पूर्वी अस्पृश्य समाजामध्ये सामाजिक चळवळ उभी करण्याचे काम विठ्ठल रामजी शिंदे यांनी केलेले दिसते. [३४]

### ५. छत्रपती शाहू महाराजांचे कार्य

१९ व्या शतकात अवघ्या महाराष्ट्रात बहुजन वर्ग हा शिक्षणापासून पूर्णपणे वंचित ठेवण्यात अभिजन वर्गाला यश आले होते. एल्फिन्स्टन व लॉर्ड मेकॉले यासारखे इंग्रज अधिकारी ऐत्तद्देशियांना शिक्षणाचा लाभ झाला पाहिजे. म्हणून प्रयत्न करत होते. पण अस्पृश्यांच्या शिक्षणाच्या बाबतीत म्हणावे तितके यश येत नव्हते.कारण शिक्षण घेण्याची मानसिकता व रुढी परंपरा विरुध्द जाण्याचे धाडस या समाजात नव्हते. या सर्व पार्श्वभूमीवर महात्मा फुलेंनी केलेल्या शैक्षणिक कामामुळे परिवर्तनाचे नवे वारे वाहू लागले होते.

१८९४ मध्ये कोल्हापूर संस्थानाची कारभार सुरु केल्यावर छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या प्रजेला ऐतिद्देशिय व इंग्रजी शिक्षण देण्याचे कार्य केले. ज्या समाजाला शिक्षणाचा

फारसा वारसा नव्हता आणि परंपरेने ज्यांना शिक्षणाचा हक्क नाकारला अशा अस्पृश्य,मागास समाजालाही शिक्षण देण्यास छ. शाहू महाराजांनी सुरुवात केली शाहू महाराजांच्या काळात ९० टक्के पेक्षा जास्त लोकसंख्या अज्ञानी व अशिक्षित होती [३५] शाहू महाराजांनी त्यांच्या राज्यात १९१७ साली सक्तीच्या मोफत शिक्षणाचा कायदा केला. [३६] अस्पृश्यांना त्यांच्या वरील बंधने झुगारुन देण्यासाठी त्यांनी 'महार वतन रयतावा' त्यामुळे महार त्यांच्या वरील धार्मिक रुढींनी लादलेल्या हालक्या कामातून मुक्त झाले.

२ एप्रिल १८९४ रोजी शाहू महाराजांनी राज्यकारभार सुरु केला. तेव्हा कोल्हापूर संस्थानची लोकसंख्या ९ लाखाहून अधिक होती, संस्थानातील शाळांची संख्या २२४ होती, त्यामध्ये सुमारे १५ हजार विद्यार्थी शिक्षणाचा लाभ घेत होते.संस्थांनचे एकूण उत्पन्न ३८,९०,०८५ रुपये इतके होते. त्यापैकी शिक्षणावरती १,४५,७२० रुपये खर्च होत होता. म्हणजे एकूण उत्पन्नाच्या ३.७५ % इतकाच खर्च शिक्षणावर होत होता. [३७]

जरी शाळांची संख्या २२४ असली तरी शिक्षण घेणारे विद्यार्थी प्रामुख्याने उच्चवर्णीयच होते. मुंबई प्रांतातील शिक्षणासाठी जितका पैसा खर्च केला जात होता त्यापेक्षा दुप्पटीहून अधिक कोल्हापूर संस्थानमध्ये शाहू महाराजांनी खर्च केले होते. शिक्षणाचे महत्व सांगताना छत्रपती शाहू महाराज म्हणतात ,

" शिक्षणानेच आमचा तरणोपाय आहे असे माझे ठाम मत आहे. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही असे इतिहास सांगतो. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्दी व लढवय्ये कधीही निपजणार नाहीत. म्हणूनच सक्तीच्या आणि मोफत प्राथमिक शिक्षणाची हिंदुस्थानला अत्यंत आवश्यकता आहे.याबाबतीत आमचा गतकाळ म्हटले म्हणजे इतिहासातील एक अंधारी रात्र आहे. फक्त एकाच जातीने विद्येचा मक्ता घेतला होता. मनू आणि त्यांच्यामागून झालेल्या शास्त्रकारांनी त्यावेळेच्या ध्येयाला अनुसरुन निरनिराळ्या जातीच्या व्यवहारास बंधनकारक असे निर्बंध रचले आणि खालच्या कमी जातीच्या लोकांना विद्यामंदिराचे दरवाजे बंद करण्यात आले"[३८]

शिक्षणातील अडचणीचे पेशवाईतील उदाहरण देताना शाहू महाराजांनी सांगितले की, ''साताऱ्याचे छत्रपती प्रतापसिंह महाराज हे पेशव्याच्या ताब्यात असताना लहानपणी लिहणे वाचणे शिकण्याचीही त्यांना बंदी होती. तेव्हा त्यांच्या पूज्य व धोरणी आईने त्यास रात्री बारा वाजता उठवून ब्राह्मणेत्तर पंतोजीकडून लिहणे वाचणे शिकविण्याचे काम केले.'' [३९] पेशवाईत खुद्द छत्रपतींना चोरुन मध्यरात्री शिक्षण घ्यावे लागत होते मग इतरांची काय अवस्था? यामुळे शाहू महारांजानी अस्पृश्य मुलांच्या स्वतंत्र सोयी सवलती तसेच पुस्तकांची सारी सोय सरकारी खर्चाने करण्यात येईल अशी राजाज्ञा १९१९ मध्ये काढली. मात्र याचवेळी लोकमान्य टिळकांचा केसरी म्हणतो,

''प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्याअगोदर सध्या उपयोगात असलेल्या शाळागृहे विस्तृत व हवेशीर केले पाहिजेत व तिकडे खर्च करण्याची जास्त जरुरी आहे''[४०] या वरुन ब्राह्मणेत्तरांच्या सक्तीच्या शिक्षणांबाबतची पुणेकरांची प्रतिक्रिया काय होती. हे सहज समजते. भारतीय समाजाची विषमतेवरती आधारलेली समाजरचना एकदम बदलता येणार नाही म्हणून छ. शाहू महाराजानी मराठा, लिंगायत, जैन, शिंपी, सोनार, मुसलमान या शिक्षणात मागासलेल्या समाजाप्रमाणेच अस्पृश्यांचेही स्वतंत्र वसतिगृह उघडले.

शाहू महाराजांनी १९०१ ते १९२१ या २० वर्षात २३ वसतिगृहे निरनिराळ्या जाती धर्माच्या विद्यार्थ्यांसाठी सुरु केली.म्हणून कोल्हापूरला वसतिगृहांची जननी म्हणतात.[४१] पुढे ८-१०-१९१९ रोजी महाराजांनी खास हुकूम काढला त्यात ते म्हणतात,

''करवीर इलाख्यात अस्पृश्य लोकांच्या मुलांसाठी स्वतंत्र शाळा आहेत.त्या येत्या दसऱ्यापासून बंद कराव्यात व अस्पृश्यांच्या मुलांस सरकारी शाळांत इतर मुलाप्रमाणेच दाखल करुन घेत जावे. सरकारी शाळेतून शिवाशिव पाळण्याची नसल्याने सर्व जातीच्या व धर्मांच्या लोकांना एकत्र बसविणेत यावे आणि या हुकूमाची अंमलबजावणी जे करणार नाहीत त्यांनी राजीनामा द्यावा. तसेच त्यांना पेन्शनही मिळणार नाही. शिक्षण संस्थेची हरकत असेल तर ग्रँट बंद केली जाईल'' याप्रमाणे अस्पृश्यांना शिक्षण नाकारणाऱ्या

विरुध्द जरब बसवणारा हुकूम सुद्धा महाराजांनी काढला.

मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्या मुलींना फी माफ, धंदेशिक्षणावरती भर, वसतिगृहांची निर्मिती यासारख्या सोयी सवलती देणारे आदेश काढून महाराजांनी दलितांच्या शिक्षणांची सोय केली. कारण शाहू महाराजांवरती म.फुलेंच्या कार्याचा व विचारांचा प्रभाव होता. म्हणूनच भारतात प्रथम २६ जुलै १९०२ रोजी मागासवर्गीसाठी ५० टक्के आरक्षण ठेवले आणि १४ एप्रिल १९०८ रोजी अस्पृश्यासाठी मिस क्लार्क होस्टेलची स्थापना केली व महिन्याला या वसतिगृहासाठी २५ रु. ग्रँट दिली जात होती."[४२] एकीकडे मागासवर्गीय विद्यार्थ्यांना करवीर संस्थानात इतके स्वाभिमानाचे शिक्षण मिळत असतानाच डेक्कन एज्युकेशन सोसायटीचा १९२० पर्यंतचा इतिहास मोठा उद्‌बोधक आहे. विष्णूशास्त्री चिपळूणकर, टिळक व आगरकर हे डेक्कन एज्युकेशनच्या सोसायटीच्या संस्थापकांपैकी होत. चिपळूणकर एका लेखात म्हणतात,

" ज्ञानाच्या किल्ल्या आमच्यापाशी आहेत. शुद्रांना आमच्याशिवाय तरणोपाय नाही "[४३] अशी त्यांची शुद्रांच्या शिक्षणाबद्दलची अवमान करणारी भाषा होती. यावरुन टिळक व चिपळूणकरांना मागासवर्गीय समाजाच्या शिक्षणासाठी दारे उघडी करायची नव्हती ही वृत्ती सहज लक्षात येते.

### ६. कर्मवीर भाऊराव पाटील

ब्राम्हणशाही कडून अशा प्रतिगामी विचारांची चलती महाराष्ट्रात असतानाच म.फुले, छ.शाहू महाराज यांच्या शैक्षणिक प्रभावाने प्रभावीत झालेले कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शैक्षणिक कार्यात महाराष्ट्रामध्ये फार मोठी आघाडी घेतली . बहुजन समाजाच्या विकासासाठी शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही. हे त्यांनी ओळखले होते. त्यामुळेच त्यांनी शिक्षणाची गंगोत्री बहुजन समाजाच्या दारोदारी नेली. १९१९ मध्ये 'काले' (सातारा) याठिकाणी रयत शिक्षण संस्थेची स्थापना करुन शेकडो शाळा बहुजनांच्या साठी सुरु केल्या. आज महाराष्ट्राच्या वाड्या वस्त्यावर पोहोचलेली शिक्षणाची गंगा ही कर्मवीर

भाऊराव पाटील यांच्या भगिरथ प्रयत्नांची फलश्रुती आहे. १९२४ साली सातारा येथील धनिणीच्या बागेत सर्वधर्मीय विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहांची सुरुवात कर्मवीर भाऊराव पाटील यांनी केली. भारतीतील हे पहिले सर्वधर्मीय वसतीगृह होय.

थोड्क्यात महाराष्ट्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्व काळात सामाजिक विषमता फार तीव्र होती. जातीव्यवस्था व इतर वाईट चालीरीती असल्याने शिक्षणापासून या समाजाला वंचित ठेवण्यात आले होते. शिक्षण ही ब्राह्मणवर्गाची मक्तेदारी जवळजवळ दोन अडीच  हजार वर्षे होती. १८१८ साली महाराष्ट्रात व भारतात इंग्रजी सत्ता सुरु झाली आणि कायद्याचे राज्य अस्तित्वात आले. १९व्या शतकात व २०व्या शतकाच्या पहिल्या २०वर्षात जे जे  समाजसुधारक झाले त्यांनी शिक्षण हा मुद्दा उचलून धरला त्याचबरोबर भारतात ख्रिश्चन मिशनऱ्यांनी दलितांना धर्मांतराकरीता का असेना शिक्षणाची दारे मोकळी केली. लष्करात काही अस्पृश्य तरुण भरती झाले. त्यांनाही इंग्रजांनी शिक्षण दिले. त्याचबरोबर म.फुले, वि.रा.शिंदे, छ.शाहू महाराज, सयाजीराव गायकवाड, इ. नी दलित वर्गातील मुलांना शिक्षणाच्या सोयी सवलत्या दिल्यामुळे थोडी-थोडी दलितांची मुले शिक्षण घेऊ लागली. खुद्द डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना बडोद्याचे सयाजीराव गायकवाड व कोल्हापूरचे छ.शाहू महाराजांनी शिक्षणासाठी  आर्थिक मदत दिली. त्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे उच्च शिक्षण घेऊन भारतात आले.पुढे १९२० पासून त्यांच्या सामाजिक कार्याला सुरुवात झाली. १९२०मध्ये माणगावच्या परिषदेत छ.शाहू महाराजांनी दलित समाजाला सांगितले की, "डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे तुमचे भावी  पुढारी आहेत" आणि १९२० नंतर डॉ.बाबासाहेब आंबडेकर हे दलितांचे एकमेव नेते बनले. शिक्षणाशिवाय दलित समाजाला तरणोपाय नाही.हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी ओळखले होते, म्हणून त्यांच्या शैक्षणिक विचारांचा आढावा व दिशा घेणे अत्यंत उद्‌बोधक ठरते. अशा प्रकारे १९२० पर्यंत मागासवर्गीय समाजाच्या शिक्षणाबाबतची स्थिती दिसून येते. म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक विचारांचा मागोवा घेणे महत्वाचे आहे.

## संदर्भ व तळटीपा


१. चव्हाण दिलीप, डॉ.आंबेडकर आणि भारतीय शिक्षणातील जातीसंघर्ष, सावित्रीबाई फुले प्रकाशन , धुळे , २००३ पृष्ठ १७.

२. एस.गुरुमुर्ती, एज्युकेशन इन साऊथ इंडिया न्यू इरा पब्लिकेशन, मद्रास.

३. चव्हाण दिलीप – डॉ. आंबेडकर आणि भारतीय शिक्षणातील जातीसंघर्ष, सावित्रीबाई फुले प्रकाशन, धुळे , २००३ पृष्ठ १८.

४. गवळी पी.ए. , सोसायटी आणि सोशल डिसॲबिलिटी अंडर द पेशवा, अप्रकाशित पी.एच.डी. प्रबंध, शिवाजी विद्यापीठास सादर, १९७९ पृष्ठ २१७.

५. कित्ता, पृष्ठ २२०.

६. खरात शंकरराव, प्रस्तावना, कृ.भ.पवार, अठराव्या शतकातील मराठा कालखंडातील सामाजिक परिस्थिती, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर १९९२.

७. ज्ञानोदय , १५ सप्टेंबर १८५३ .

८. भावे वा.कृ., पेशवेकालीन महाराष्ट्र, वरदा प्रकाशन पुणे १९९८ पृष्ठ ८०.

९. चव्हाण दिलीप, उपरोक्त पृष्ठ २०.

१०. घोडके ह.म. महाराष्ट्र गाथा, राजहंस प्रकाशन, पुणे, २००० पृष्ठ २२३.

११. कित्ता

१२. कीर धनंजय, महात्मा फुले : शैक्षणिक तत्वज्ञान व कार्य, खंड-१- मुंबई १९६८ पृष्ठ १२३ .

१३. चव्हाण दिलीप, उपरोक्त पृष्ठ २३.

१४. कित्ता

१५. सुतार ए.एम., ख्रिश्च्यानीटी इन वेस्टर्न महाराष्ट्र इन नायंटीन्थ सेंच्युअरी , अप्रकाशित पी.एच.डी. प्रबंध, शिवाजी विद्यापीठास सादर, १९८०.

१६. खैरमोडे चां. भ., डॉ. आंबेडकर यांच्या चळवळीची पार्श्वभूमी, श्री विद्या प्रकाशन पुणे, १९८८, पृष्ठ ५१.

१७. कित्ता

१८. सुतार ए.एम, उपरोक्त, पृष्ठ १०५ ते १२०.

१९. कित्ता

२०. कित्ता

२१. कित्ता

२२. खैरमोडे चां. भ. , उपरोक्त पृष्ठ ५०.

२३. वसंत मून, (संपादक) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे लेखन आणि भाषणे खंड नं. २

२४. नरके हरि (संपादक) आम्ही पाहिलेले फुले, म.फुले चरित्र साधने प्रकाशन समिती,महाराष्ट्र शासन १९९३, पृष्ठ १४६.

२५. फडके य.दि., म. फुले समग्र वाङ्‌मय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ १९६९, पृष्ठ ६०७.

२६. ठोंबरे तानाजी, म. फुले यांचे शैक्षणिक कार्य, लोकवाङ्‌मय गृह मुंबई, १९९१, पृष्ठ २८.

२७. फडके य. दि. उपरोक्त पृष्ठ ७१५

२८. कित्ता पृष्ठ ७१९.

२९. कित्ता पृष्ठ ७२०.

३०. कित्ता पृष्ठ ७२३.

३१. कित्ता पृष्ठ ७२४ .

३२. खैरमोडे चां. भ., उपरोक्त, पृष्ठ १३८.

३३. कित्ता

३४. कित्ता

३५. पाटील पी. ए, आण्णासाहेब लठ्ठे आणि त्यांचा कालखंड, अप्रकाशित पी.एच.डी.प्रबंध, शिवाजी विद्यापीठास सादर, १९८६ पृष्ठ २१.

३६. खणे बी.डी., श्री शाहूच्या सामाजिक, राजकीय सुधारणांचा अभ्यास, अप्रकाशित पी.एच.डी प्रबंध, शिवाजी विद्यापीठास सादर १९७८ पृष्ठ १४४.

३७. जाधव रमेश, लोकराजा शाहू छत्रपती, सुरेश एजन्सी,पुणे २००२ पृष्ठ १६१.

३८. पानसरे गोविंद, राजर्षी शाहू वसा आणि वारसा, प्रबोधन प्रकाशन इचलकरंजी, १९९७ पृष्ठ १७.

३८. कित्ता

३९. कित्ता

४०. कित्ता

४१. जाधव रमेश उपरोक्त पृष्ठ १६१ ते १६५.

४२. खणे बी.डी. उपरोक्त पृष्ठ १४४ ते १४८.

४३. प्राचार्य दाभोळकर देवदत्त , महाराष्ट्रातील शिक्षण व समाज परिवर्तन, शिवाजी विद्यापीठ प्रकाशन, कोल्हापूर, १९८९, पृष्ठ ५.